**Aspira Pathlab & Diagnostics Limited**
**Registered. Office:** Flat No. 2, R D Shah Building, Shraddhanand Road, Opp. Railway Station, Ghatkopar (W), Mumbai-400086
**Corporate Office:** 6 & 7, Bhaveshwar Arcade, Near Shreyas Junction LBS Marg, Behind Saraswat Bank, Ghatkopar (W), Mumbai-400086
**CIN:** L85100MH1973PLC289209

**Date: September 03, 2025**

To,
Listing Department
**BSE Limited**
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai-400001.

***Security Code: 540788***
***Security ID: ASPIRA***

**Subject: Newspaper Advertisement for intimation of 52nd (Fifty-Second) Annual General Meeting of the Company**

Dear Sir/Madam,

Please find enclosed copies of newspaper advertisement published in the "Business Standard" (English) and "Parshuram Samachar'" (Marathi) newspaper dated on September 03, 2025 relating to 52nd (Fifty-Second) Annual General Meeting of the Company to be held on **Friday, September 26, 2025 at 02.00 P.M (IST) through Video Conferencing/ Other Audio Visual Means** ("VC/ OAVM").

The above intimation is also made available on the website of the Company at www.aspiradiagnostics.com

Kindly take the above information on your record.

Thanking you,

Yours Faithfully,
For **Aspira Pathlab & Diagnostics Limited**

**Krupali Shah**
**Company Secretary & Compliance Officer**

## संपादकिय

# आर्थिक वाढीचे आकडे उत्साहवर्धक; पण पुढची वाटचाल कठीण

सध्याच्या आर्थिक अनिश्चिततेच्या वातावरणात चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीचे (एप्रिल-जून) जीडीपी आकडे तज्ज्ञांना आणि अंदाज बांधणाऱ्यांना थोडेसे आश्चर्यचकित करणारे ठरले आहेत. नुकतेच जाहीर झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, अर्थव्यवस्था जून तिमाहीत तब्बल ७.८ टक्क्यांनी वाढली आहे. ही वाढ मागील पाच तिमाहींतील सर्वाधिक आहे. सकल मूल्य वर्धन देखील ७.६ टक्क्यांनी वाढला असून, हा अर्थव्यवस्थेचा अधिक अचूक सूचक मानला जातो. भारतीय रिझर्व्ह बँकेने या तिमाहीसाठी ६.५ टक्के वाढीचा अंदाज व्यक्त केला होता; मात्र त्यापेक्षा जास्त वाढ झाली आहे. तथापि, ही गती कायम ठेवणे आणि संपूर्ण वर्षासाठी ६.५ टक्क्यांचा वाढीचा टप्पा गाठणे हे अनुकूल व्यावसायिक वातावरणाशिवाय कठीण ठरू शकते. पहिल्या तिमाहीत अर्थव्यवस्थेच्या जवळपास सर्वच क्षेत्रांनी वाढीस हातभार लावला. कृषी क्षेत्र ३.७ टक्क्यांनी वाढले (गतवर्षी १.५ टक्के), विनिर्माण क्षेत्राने ७.७ टक्के वाढ नोंदवली, सेवाक्षेत्रातही चांगली वाढ झाली. तथापि, खनन व उत्खननात घट दिसली, तसेच बांधकाम क्षेत्रात मंदी जाणवली. उच्च वाढीसाठी सरकारी खर्चानेही मोठी मदत केली. या तिमाहीत सरकारी खर्च ७.४ टक्क्यांनी वाढला. केंद्र सरकारने पहिल्या तिमाहीत वार्षिक भांडवली खर्चाच्या जवळपास चौथ्या भागाएवढा खर्च केला, तर गेल्या वर्षी याच काळात तो फक्त १६ टक्के होता. तरीसुद्धा, पुढील वाटचाल सोपी नसेल. वाढीपुढील सर्वात मोठा धोका म्हणजे अमेरिकेकडून लावण्यात आलेले जादा शुल्क. अंदाजानुसार, भारताच्या जवळपास ६६ टक्के निर्यातीवर ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त शुल्काचा फटका बसेल. हे शुल्क किती काळ लागू राहते, यावर वाढीचा परिणाम ठरणार आहे. जर हे काही तिमाहींकरता टिकले, तर रोजगार आणि देशांतर्गत मागणीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. याशिवाय, जीएसटी दरकपातीच्या चर्चेमुळेही सध्याच्या तिमाहीवर परिणाम दिसू शकतो. अनेक कुटुंबे खरेदीचे निर्णय पुढे ढकलत आहेत. जसे की, कारसारख्या वस्तूंवर दरकपातीची शक्यता असल्यामुळे विक्री कमी झाली आहे. मात्र, हा परिणाम अल्पकाळापुरताच राहील. दर कमी होताच मागणी पुन्हा वाढेल. आणखी एक मोठी समस्या म्हणजे नाममात्र वाढीचा अभाव. चालू किंमतींवर जीडीपी वाढ पहिल्या तिमाहीत फक्त ८.८ टक्के राहिली आहे. महागाईचा दर कमी राहिल्यास, ही नाममात्र वाढ याच पातळीवर किंवा त्याहून कमी होण्याची शक्यता आहे.

**संपादक - दिलीप सिध्देशवर सिंग**

## प्रेमविवाहाचा राग, सेवानिवृत्त सैनिकाने बहिणीच्या नवऱ्यावर झाडली गोळी

पान क्र. १ वरुन...

प्राथमिक चौकशीत समोर आले की, या घटनेमागे २०१४ सालच्या एका प्रेमविवाहाचा वाद कारणीभूत आहे. विनोद पाटील यांनी त्यावेळी नीलेशच्या बहिणीशी प्रेमविवाह केला होता. या विवाहाला मोहिते कुटुंबीयांनी सुरुवातीपासूनच तीव्र विरोध दर्शवला होता. परिणामी दोन्ही कुटुंबांमध्ये संबंध तणावपूर्ण राहिले. याच रागातून सोमवारी सकाळी घडलेली वादावादी इतकी वाढली की गोळीबारापर्यंत पोहोचली. घटनेची माहिती मिळताच शाहूवाडी विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी आप्पासाहेब पवार यांनी रुग्णालयात जाऊन जखमीची विचारपूस केली. त्यानंतर फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या पथकाने घटनास्थळी भेट देत पुरावे गोळा केले. आरोपी नीलेश याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास कोडग यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. दरम्यान, जिल्ह्यातील नागरिकांमध्ये या घटनेनंतर भीतीचे वातावरण आहे. चारच दिवसांत दोन वेळा गोळीबार झाल्याने कायदा व सुव्यवस्थेची स्थिती चव्हाट्यावर आली आहे. नुकत्याच शिये फाटा येथे किरकोळ वादातून संशयिताने हवेत गोळ्या झाडल्याचा प्रकार घडला होता. त्यावेळी मोठा अनर्थ टळला होता, मात्र सलग घडणाऱ्या घटनांनी पोलीस यंत्रणेसमोर कठीण आव्हान उभे केले आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गर्दीचे वातावरण असतानाच अशा गुन्ह्यांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे. जिल्हा पोलिस प्रशासनाने कठोर कारवाईचे संकेत देत सर्वाधिक संवेदनशील भागात बंदोबस्त वाढवण्याचे आदेश दिले आहेत. मात्र वारंवार होणाऱ्या गोळीबाराच्या घटनांनी कायदा सुव्यवस्थेबाबत गंभीर चर्चा सुरू झाली आहे.

## आपला विजय झाला, मनोज जरांगेंची घोषणा, जवळपास सर्वच मागण्या मान्य!

पान क्र. १ वरुन...

आता ते म्हणाले आपल्याला मान्य झालं की जीआर काढणार, यांच्याशी चर्चा केल्यानंतर आपण अभ्यासकांसोबत सुद्धा चर्चा करणार आहोत नाहीतर वाशी सारखा व्हायचं, असे म्हणत वाशीमध्ये आपली फसवणूक झाल्याचं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. हैद्राबाद गॅझेट लागू करण्याच्या मागणीस उपसमितीने मान्यता दिली आहे, याचा अर्थ हैद्राबाद गॅझेटची अंमलबजावणी करण्याची सूचना उपसमितीकडून देण्यात येईल. सातारा गॅझेटबद्दल आपण मागणी केली होती, म्हणजे पश्चिम महाराष्ट्र मराठा यामध्ये येतो. औंध आणि सातारा मध्ये काही त्रुटी आहेत. पुढील १५ दिवसात कायदेशीर त्रुटीचा अभ्यास करून अंमलबजावणी केली जाईल, असे शासनाने म्हटले आहे. मी एक महिना देतो, राजे सांगा अंमलबजावणी करणार का? हो म्हणा, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी शिवेंद्रराजे यांच्याकडूनच याची हमी घेतली आहे. त्यामुळे, आता दोन मागण्यांची अंमलबजावणी झाल्याचं म्हटलं. ५ मागण्यांचे आजच शासन निर्णय होणार - हैदराबादच्या गॅजेटला अंमलबाजावणीला दिली आहे, पुढील काही तासांत याचा शासन आदेश निघेल. सातारा संस्थानच्या गॅजेटेयर तपासून कायदेशीर पद्धतीने जलदगतीने म्हणजेच १५ दिवसांत अमंलबजावणी करु सातारा गॅजेटेअर लागू करण्यासाठी मी एक महिना दिला आहे, त्याचाही शासन आदेश निघणार आहे. सप्टेंबरअखेरपर्यंत सर्व मराठा आंदोलकांविरोधातले गुन्हे मागे घेणार, त्याचाही शासन आदेश लवकरच निघणार आहे. आर्थिक मदत आणि शैक्षणिक पात्रतेनूसार शासकिय नोकरी देणार

## अलिबाग, नवी मुंबईची Connectivity वाढवणार! २२९ कोटींच्या प्रोजेक्टला SC चा ग्रीन सिग्नल

पान क्र. १ वरुन...

तसंच, यामुळं ट्रॅफिकदेखील कमी होणार आहे. १) गेटवे ऑफ इंडिया जेट्टी प्रकल्प काय आहे? हा महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाचा प्रकल्प असून, दक्षिण मुंबईतील गेटवे ऑफ इंडियाजवळ १.५ एकर समुद्र क्षेत्रावर नवीन प्रवासी जेट्टी आणि टर्मिनल बांधले जाणार आहे. यात १५० वाहनांसाठी पार्किंग, व्हीआयपी प्रतीक्षालय, तिकीट काउंटर, प्रशासकीय कार्यालये आणि टेनिस रॅकेटच्या आकाराची जेट्टी असेल. २) हा प्रकल्प कोठे बांधला जाणार आहे? गेटवे ऑफ इंडियापासून २८० मीटर अंतरावर, कुलाबा परिसरातील ताजमहाल पॅलेस हॉटेलजवळ हा प्रकल्प उभारला जाईल. ३) या प्रकल्पाची किंमत किती आहे? या प्रकल्पाचा खर्च २२९ कोटी रुपये आहे.

## OBC तून आरक्षण दिल्यास आम्हीही मुंबईत येऊ, छगन भुजबळांचा थेट इशारा

पान क्र. १ वरुन...

ओबीसीतून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हैदराबाद गॅझेटचा आधार ते घेत आहेत, परंतु त्यात देखील मराठा आणि कुणबी वेगळे दाखवले आहेत. त्यावेळी, १९२१ साली २ लाख मराठा तिथ होते, तर ३३ हजार कुणबी होते. देवेंद्र फडणवीस असोत की शरद पवार ५० टक्क्याच्या आत कोणीही आरक्षण देऊ शकत नाही. मराठा समाज आर्थिक, सामाजिक मागास नाही, तरीदेखील आरक्षणाची मागणी करत आहे. ईडब्ल्यूएस, एसईबीसी तसेच ओपन आणि ओबीसी अशा चार आरक्षणाचा फायदा घेत आहे, असे म्हणत छगन भुजबळ यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देता येणार नसल्याचे स्पष्ट केले. मुख्यमंत्री यांनी शब्द दिला आहे, ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही. मी कुणबी आणि मराठा वेगळे असल्याचे दाखले दिले आहेत. मुंबई जाम करणे आमच्यासाठी अवघड नाही, जर तुम्ही निर्णय घेतला तर आम्हाला देखील मुंबईला यावं लागेल, असे म्हणत छगन भुजबळ यांनीही ओबीसी आंदोलकांच्यावतीने मुंबई जाम करण्याचा इशारा दिलाय. उद्यापासून ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण नको ही भूमिका घेऊन राज्यभर आंदोलने केली जातील आणि निवेदन देखील दिल जाईल, असेही भुजबळ यांनी म्हटलं. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देता येणार नाही, मराठा कुणबी एक होऊ शकत नाही. मराठा आणि कुणबी एक, हा मूर्खपणा असल्याचं त्यांनी म्हटलं. राज्यात अनेक मोर्चे निघाले, त्यावेळी एक महत्त्वाचा मुद्दा समोर आला होता. (कोर्ट काय म्हणाले ते भुजबळ यांनी वाचून दाखवले) केंद्र सरकारने एक कायदा बनविला आहे, जे ओबीसी, दलित किंवा आदिवासीमध्ये बसत नाहीत, पण ते आर्थिक मागास आहे. त्यानुसार, सामाजिक दृष्ट्या ऐं आरक्षण लागू झाले आहे. त्यात १० टक्के आरक्षण आहे, इतर ८ टक्के उमेदवार मराठा समाजाचे आहे हे सरकारने जाहीर केले आहे, असेही भुजबळांनी म्हटल. पाटीदार, जाट, गुजर आणि काबूचे आंदोलन मागे झाले होते, अशी माहितीही भुजबळांनी दिली.

## आंदोलक मुंबईत येईपर्यंत तुम्ही काय करत होतात? न्यायालयाने सरकारचे कान उपटले

पान क्र. १ वरुन...

५० हजारांपेक्षा जास्त लोक होती, तोवर तुम्ही काय करत होता असा सवाल उच्च न्यायालयाने उपस्थित केला आहे. तुम्ही जर २४ तासांनी संतुष्ट नव्हता तर तुम्ही देखील कोर्टात यायला हवं होतं, उच्च न्यायालयाने आंदोलनकर्त्यांच्या वकिलांना बजावलं. ३१ मे ला आम्ही पहिला अर्ज केला, २५ जुलैला दुसरा अर्ज केला. त्यानंतर आम्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर बैठक केली. मात्र आम्हाला गाड्या पार्क करायला जागा दिली नाही, आता तुम्ही म्हणू शकत नाही की पूर्वकल्पना दिली नाही ही भूमिका आंदोलनकर्त्यांची आहे. याबाबत आपली मनोज जरांगे यांची भूमिका मांडताना सतीश मानेशिंदे म्हणाले, आम्ही लोकांना ठिकाणं खाली करण्यास सरकारला सहकार्य करण्यास आणि गाड्या काढण्यास सांगितलं आहे. कायदा व व्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याचं आवाहन करण्यात आलं आहे.जे लोक आंदोलनात भाग घेण्यासाठी आले आहेत त्यांनी शहरातून बाहेर जाण्यास सुरूवात केल्याचं वकिलांनी सांगितलं आहे. सुनावणी तहकूब करण्यात आली आहे. या सुनावणीत ज्येष्ठ विधिज्ञ बिरेंद्र सराफ यांनी राज्य सरकारची बाजू मांडली. त्यांनी म्हटले की, आझाद मैदानाच्या परिसरात मराठा आंदोलक थांबले तर अडचण निर्माण होईल. आम्ही अद्याप कोणतीही कठोर कारवाई केली नाही. मनोज जरांगे यांनी लिखित स्वरुपात किंवा लोकांना आवाहन करुन आंदोलनकर्त्यांना मुंबई सोडायला सांगावी. जरांगे पाटील यांना नोटीस देण्यात आली असून आम्ही त्यांना आझाद मैदानाची जागा खाली करायला सांगितले आहे. आम्ही सगळीकडे बॅनर्स लावून सूचना दिल्या आहेत. त्यानंतर आंदोलकांची संख्या कमी झाली आहे. काही भागात अजूनही मोठ्याप्रमाणावर वाहने आहेत. काही लोक ऐकत आहेत, तर काही लोक अजिबात ऐकत नाहीत. काल रात्रीपासून पोलीस रस्त्यावर असून आंदोलनकर्त्यांना विनंती करत आहेत, असे राज्य सरकारकडून कोर्टात सांगण्यात आले.

## मुंबईत ओढावलेल्या परिस्थितीला आंदोलनाचे आयोजक जबाबदार, लक्ष्मण हाके संतापले

पान क्र. १ वरुन...

शासन प्रशासनांनी जरांगे आणि समर्थकांना मुंबईत यायलाच द्यायला नको होतं .झुंडशाहीच्या मार्गाने सगळे आले आहेत .गेल्या दोन-चार दिवसांपासून मुंबईमध्ये जी परिस्थिती ओढवली आहे त्याला या आंदोलन सांभाळणारी माणसे जबाबदार असल्याचं हाके म्हणालेत . ज्या गावातून मराठा आंदोलनाचे रूप व्यापक झाले त्यानंतरवली सराटी येथे आता मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण देऊ नये यासह अन्य मागण्यासाठी ओबीसी आंदोलकांनी सोमवारपासून उपोषणास सुरुवात केली . मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मागणीमुळे आता राजकीय पटलावर वातावरण तापलं आहे . ओबीसी नेते लक्ष्मण हाके म्हणाले,' कायदा हा सर्वश्रेष्ठ आहे .न्यायिक व्यवस्था श्रेष्ठ असते .यांची गुंडशाहीची सुरू आहे .यांची पार्श्वभूमी पाहता मुंबई वेठीस धरणार हे होणार होतं .शासन प्रशासनांनी यांना मुंबईत यायला द्यायला नको होत .झुंडशाही मार्गाने सगळे आले आहे .गेल्या दोन चार दिवसापासून मुंबईमध्ये जी परिस्थिती उडवली आहे त्याला या आंदोलन सांभाळणारी माणसे जबाबदार आहेत .जरांगे पाटील यांच्या तब्येतीची काळजी घ्या .जर कायदा कोणी पाळत नसतील तर त्यांना कायद्याचा बडगा पहिल्यांदा दाखवा .सरकारला असला कुठलाही जी आर काढायचा अधिकार नाही. न्यायालयापेक्षा कोणी मोठे समजू नये. ओबीसी आरक्षण घालण्याचा घाट घातला जात आहे का शरद पवार,उद्धव ठाकरे,सुप्रिया सुळे यांच्याकडून महाराष्ट्र शासनाने एक प्रश्न सोडवण्यासाठी दहा प्रश्न उभे करत आहे. ' असे हाके म्हणाले .

## मुंबईकरांना मिळणार नवे पर्यटनस्थळ; सिंगापूरच्या धर्तीवर देशातील पहिलाच प्रकल्प मुंबईत

पान क्र. १ वरुन...

हे उद्यान गोराई जेट्टीजवळ असून या उद्यानाचे काम अंतिम टप्प्यावर पोहोचले आहे. सिंगापूर, अबूदाबी, थायलंडच्या धर्तीवर गोराईत उन्नत मार्ग साकारण्यात येणार आहे. हा मार्ग लाकडी असून ७०० मीटर लांबी आणि रुंदी २.४ मीटर आहे. तसंच, उन्नत मार्गाच्या मध्ये विश्रांतीस्थळ व आसन व्यवस्था असणार आहे. बोर्डवॉकदेखील तयार करण्यात आला असून या बोर्डवॉकवरुन पर्यटकांना कांदळवन न्याहाळता येणार आहे. पर्यटकांसाठी बोर्डवॉकवर विविध ठिकाणी आसन व्यवस्थादेखील करण्यात आली आहे. गोराई खाडीतून पर्यटकांना कांदळवनाची सफर होणार आहे. दरम्यान, कांदळवनाचा ऱ्हास होऊ नये म्हणून २०१२मध्ये कांदळवन कक्ष सुरू करण्यात आला. २०१३मध्ये सरकारी जागांवरील कांदळवनांचे नाव आरक्षित वनेऐवजी राखीव वने असे करण्यात आले. कांदळवनांवरील अतिक्रमणे, प्रदूषण, औद्योगिकीकरण प्रदूषण या बाबी लक्षात घेऊन कांदळवन कक्ष तयार करण्यात आला आहे. तसंच, कांदळवन हे पूरपरस्थिती रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळं पर्यावरणाच्या दृष्टीने त्याचे महत्त्व अधिक आहे. गोराई कांदळवन उद्यान हे भारतातील पहिले समर्पित कांदळवन उद्यान आहे, जे मुंबईतील बोरिवली येथील गोराई खाडीलगत उभारण्यात येत आहे. हे उद्यान ८ हेक्टर क्षेत्रावर विकसित केले जात असून, पर्यटकांना कांदळवनाची सफर आणि पर्यावरण शिक्षणाचा अनुभव देण्यासाठी सिंगापूर, अबूधाबी आणि थायलंडच्या धर्तीवर तयार करण्यात येत आहे. हे उद्यान बोरिवलीतील गोराई खाडीलगत, गोराई जेट्टीजवळ आहे. याचे काम अंतिम टप्प्यावर असून, लवकरच (मे २०२५ किंवा जास्तीत जास्त जून २०२५ पर्यंत, जागतिक पर्यावरण दिनानिमित्त) याचे लोकार्पण होण्याची शक्यता आहे. उद्यानातील प्रमुख आकर्षण म्हणजे ७००-७५० मीटर लांबीचा आणि २.४ मीटर रुंदीचा लाकडी उन्नत मार्ग (बोर्डवॉक). हा मार्ग पर्यटकांना कांदळवनातून थेट सफर घडवेल, ज्यामुळे ते कांदळवनाची जैवविविधता आणि पर्यावरणाचे महत्त्व जवळून अनुभवू शकतील.

## धुळ्यात बोहल्यावर चढवून गंडा घालणारी टोळी गजाआड, पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

पान क्र. १ वरुन...

२१ ऑगस्ट रोजी तुषारच्या आईला लग्न लावणाऱ्या एजंटचा मोबाईल क्रमांक नातेवाईकांकडून मिळाला. ला लावणारा एजंट हा नागपूर येथील रहिवासी असल्याचे समोर आले. २५ ऑगस्ट रोजी तुषारच्या आईने सांगितल्याप्रमाणे एजंट, लग्न करणारी मुलगी, तिच्या सोबत तिची बहीण असे तिघे तुषारच्या घरी आले. मुलीला बघण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर एजेंट याने लग्न लावण्यासाठी १ लाख ५० हजार रुपये लागतील असे सांगितले. तुषारच्या घरच्यांनी एजंट व मुलीच्या बहीणीस १ लाख ३० हजार रुपये रोख व ऑनलाईन पध्दतीने दिले. त्यानंतर तुषारचे लग्न काजल (वय २०) नामक मुलीशी एकविरादेवी मंदीर येथे लावून देण्यात आले. लग्नाच्या अवघ्या एक ते दोन दिवसांत तुषार याला पत्नी काजल हिच्या वागणुकीवरून संशय आला. त्याने तिच्या आधारकार्डाची पडताळणी केली. ती राजस्थान येथील असल्याचे त्याला समजले. त्यानंतर काजल हिचे इन्स्टाग्राम आयडीची तपासणी केली असता तिच्या गळ्यात मंगळसूत्र व सोबत लहान मुलगा असल्याचे दिसून आल्याने तरुणाचा संशय अधिक बळावला. त्यांनतर तुषार याने घरातील लोकांना विश्वासात घेवून सर्व हकिकत सांगितली. पुन्हा मैत्रीणीच्या भावाला मुलीचे स्थळ आणा म्हणून एजंट सचिन मरगडे यास संपर्क करण्यात आला. त्याने उज्जैन येथे मुलगी आहे, तिला दाखविण्यास घेवून येतो असे सांगितले. त्याप्रमाणे पुनम नावाच्या मुलीला दाखवायला एजेंट हा घेवून आला. लग्नासाठी दलाली म्हणून १ लाख ५० हजार रुपयाची मागणी त्याच्याकडून करण्यात आली. १ सप्टेंबर रोजी या संशयाबाबत तुषारने चाळीसगाव रोड पोलिसांशी संपर्क साधला. त्यानंतर पोलिसांच्या सांगण्यावरुन तुषारने चाळीसगाव रोड चौफुली येथे एजंट सचिन मरगडे व तुषार याची तथाकथीत पत्नी काजल, काजल हिची बहीण असल्याची सांगणारी नेहा व उज्जैन येथून आलेली मुलगी पुनम अशांना बोलावून घेतले. यावेळी पोलिसांनी त्यांना सापळा लावून जेरबंद केले. त्यांना ताब्यात घेवून पोलीस ठाण्यात आणल्यानंतर त्यांची चौकशी करण्यात आली. एजंट व या तिघांनी मिळून यापुर्वी अनेक ठिकाणी पैसे घेतले. लग्न लावले. तरुणांची फसगत करत पळ काढल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. याप्रकरणी तुषार रमेश खैरनार याने दिलेल्या फिर्यादीवरून एजंट सचिन मरगडे काजल, काजलची बहिण सांगणारी नेहा, उज्जैन येथून आलेली मुलगी पुनम या चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांना अटक करण्यात आली.

### जाहिरात ..

गणेश पावतो नवसा
मंडळे करी जाहिरात
भक्तमंडळी रे सक्रिय
गर्दी वाढवी रातोरात

विश्वास ठेवी भाविक
उस्फुर्त भावनाभरात
ओघ इथला वाढावा
असो ईश्वर चराचरात

सेलिब्रिटीनाबोलवावे
नेत्यांची काढा वरात
फटाफट पावती फाटे
देणग्यांचे ओघजोरात

नारळ तोरण बांधावे
विक्रमी विक्री हारात
सोने नाणी भेटी वस्तु
फळे मिठायात खैरात

व्यवसाय ते तेजीमध्ये
लक्ष्मीअवतरते दारात
भाव घे अव्वाचे सव्वा
बार्गेनिंग ना करे दरात

मिडीयाला करे तैनात
लोण पसरो क्षणार्धात
नास्तिकहोई आस्तिक
माणूसपिचला स्पर्धात

विघ्नहर येई मदतीस
नाम घ्या जरी मनात
सावली रे पायाखाली
कशासकष्टता उन्हात

### गौरी गणेश मुर्ती ..

गणपती मुर्ती घडवी
लाखलाख मुर्तीकार
हिंदु मुस्लिम ईसाई
सकल जातकामगार

भेद भाव न गणेशां
फक्त हवे कारीगार
उत्सवा मुळे मिळतो
गरीब घरांस आधार

मुर्ती बनता बनवता
जीवना देतो आकार
मुर्ती भासते जीवंत
आपले मनी विकार

पोटभरून जेवतात
ते असंख्य कलाकार
ईश्वर असे कनवाळू
सर्वां प्रदान रोजगार

उत्साह असा उत्सवा
भरतो नवीन हुंकार
भेदा भेद हे जळावे
मिळो सर्वां अधिकार

गजानन सोबत गौरी
परंपरेतला चमत्कार
नर नारी समान मान
दोघांना समनमस्कार

पुराण काळा पासून रे
नरनारीस समाधिकार
मानवा केवळअहंकार
गण गौरी ते निर्विकार

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

## बाप्पाच्या निरोपास पावसाची हजेरी; राज्यात पुन्हा मुसळधार! अनेक जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा?

पान क्र. १ वरुन...

ज्यामुळं राज्यात पुन्हा एकदा पावसाच्या ढगांचीच दाटी होताना दिसत आहे. दरम्यान मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये पावसाची रिमझिम आणि अधूनमधून येणाऱ्या जोरदार सरींची हजेरी असेल. सप्टेंबरअंती पावसाचा जोर ओसरण्यास सुरुवात होणार असून, यादरम्यानच परतीच्या पावसाची सुरुवात होणार आहे. ज्यामुळं काही भागांमध्ये टप्प्याटप्प्यानं तापमानवाढीसही सुरुवात होणार असल्याचा अंदाज हवामान जाणकारांनी वर्तवला आहे. गणेशोत्सवाच्या काळात, विशेषतः विसर्जनाच्या दिवसांमध्ये, महाराष्ट्रात पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये मध्यम ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. ऑरेंज अलर्ट: विदर्भातील पूर्वेकडील जिल्हे (चंद्रपूर, गडचिरोली), कोकणातील किनारपट्टी भाग (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग) यलो अलर्ट: मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील काही भागांसाठी यलो अलर्ट सध्याच्या घडीला म्यानमारच्या किनाऱ्यालगतच्या सागरी क्षेत्रात चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली आहे. यामुळे कमी दाबाचा पट्टा तयार होण्यासाठी पोषक वातावरण तयार झालं आहे.

## ८ सप्टेंबरला संपूर्ण राज्यात सुट्टी? CM फडणवीस घेणार मोठा निर्णय?

पान क्र. १ वरुन...

या बैठकीत मोहम्मद पैगंबर साहेब यांच्या जन्मदिनी काढण्यात येणारा जुलूस शुक्रवारऐवजी सोमवारी ८ सप्टेंबर रोजी आयोजित करण्याचा निर्णय सर्वानुमते झाला. या निर्णयाची राज्यभर अंमलबजावणी होणार आहे, असे आमदार शेख यांनी म्हटलं आहे. त्यामुळे आता मुख्यमंत्री यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेणार का? हे पहावे लागणार आहे. खरोखरच यासंदर्भात सकारात्मक निर्णय झाल्यास राज्यात सोमवारीची सुट्टी जाहीर केली जाईल. महाराष्ट्रात ८ सप्टेंबर २०२५ रोजी 'ईद-ए-मिलादुन नबी' जुलूसानिमित्त शासकीय सुट्टी जाहीर होण्याची शक्यता आहे. ही सुट्टी मुस्लिम समाजासाठी पवित्र असलेल्या पैगंबर मोहम्मद यांच्या जन्मदिनानिमित्त काढल्या जाणाऱ्या जुलूसासाठी प्रस्तावित आहे. समाजवादी पक्षाचे 'भिवंडी पूर्व'चे आमदार रईस शेख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ८ सप्टेंबर २०२५ रोजी 'ईद-ए-मिलादुन नबी' जुलूसानिमित्त शासकीय सुट्टी जाहीर करण्याची मागणी केली आहे. हिंदू-मुस्लिम समुदायांमध्ये शांती आणि एकोपा कायम राहावा यासाठी 'ऑल इंडिया खिलाफत कमिटी'च्या बैठकीत जुलूस ५ सप्टेंबरऐवजी ८ सप्टेंबर रोजी काढण्याचा निर्णय घेण्यात आला.

ASPIRA ॲस्पिरा पथलॅब ॲंड डायग्नोस्टिक्स लिमिटेड
(मध्ये: - L85100MH1973PLC289209)
Regd. कार्यालयः फ्लॅट नंबर २, आर.डी. शाह इमारत, श्रद्धानंद रोड, समोर. घाटकोपर रेल्वे स्टेशन, घाटकोपर (प). मुंबई-४०००८६. कॉर्पोरेट ऑफिसः ६ आणि ७, भावेश्वर आर्केड, श्रेयस जंक्शन जवळ, LBS Marg, Behind Saraswat Bank, Ghatkopar (W), Mumbai-४०००८६
वेबसाइटः www.aspiradiagnostics.com
ईमेलः info@aspiradiagnostics.com; फोनः ०२२ ७१९७५७५६
पन्नासव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, ॲस्पिरा पॅथलॅब ॲंड डायग्नोस्टिक्स लिमिटेडच्या सदस्यांची पन्नासावी वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम") शुक्रवार, २६ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २:०० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ("व्हीसी")/ इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमे ("ओएव्हीएम") द्वारे आयोजित केली जाईल. कंपनी कायदा, २०१३ च्या लागू तरतुदींनुसार आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांनुसार आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ("एमसीए") आणि भारतीय सिक्युरिटीज ॲंड एक्सचेंज बोर्ड ("सेबी") यांनी अनुक्रमे २५ सप्टेंबर २०२३ आणि ७ ऑक्टोबर २०२३ रोजी जारी केलेल्या परिपत्रकाच्या प्रकाशात, सदस्यांची प्रत्यक्ष उपस्थिती न घेता. २०२४-२५ आर्थिक वर्षाच्या वार्षिक अहवालासह एजीएम बोलावण्याची सूचना केवळ त्या भागधारकांना ईमेलद्वारे पाठवली जाईल ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरीजमध्ये नोंदणीकृत आहेत. हे कागदपत्रे कंपनीच्या वेबसाइट www.aspiradiagnostics.com वर, स्टॉक एक्सचेंजची वेबसाइट म्हणजेच BSE लिमिटेड ("BSE") www.bseindia.com वर आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ("NSDL") च्या वेबसाइट www.evoting.nsdl.com वर देखील उपलब्ध असतील. ज्या सदस्यांनी त्यांचा ईमेल पत्ता नोंदणीकृत केलेला नाही, त्यांच्यासाठी कंपनी /RTA वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वार्षिक अहवाल पाहण्यासाठी वेब लिंक आणि वेबसाइटचा अचूक मार्ग असलेले एक भौतिक पत्र पाठवेल.

ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची पद्धतः
वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केल्याप्रमाणे, भागधारक दूरस्थपणे (रिमोट ई-व्होटिंग कालावधी दरम्यान) किंवा वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान (ई-व्होटिंगसाठी विंडो सक्रिय असताना) इलेक्ट्रॉनिक पद्धतीने व्यवसायांवर त्यांचे मतदान करू शकतील.
ई-व्होटिंगबाबत सविस्तर सूचना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत समाविष्ट केल्या जातील आणि योग्य वेळी वर्तमानपत्रात देखील प्रकाशित केल्या जातील.

ईमेल पत्ता अपडेट करण्यासाठी सूचनाः
ज्या शेअरहोल्डर्सचा ईमेल पत्ता नोंदणीकृत/अपडेट केलेला नाही, त्यांना विनंती आहे की त्यांनी खाली दिलेल्या प्रक्रियेचे पालन करून तो नोंदणीकृत/अपडेट करावाः
(अ) नोंदणी करण्यासाठी किंवा ईमेल पत्ते अपडेट करण्यासाठी, सदस्यांना रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट ("RTA") म्हणजेच MUFG इनटाइम प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंकइन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) यांच्याकडे फॉर्म ISR-१ सादर करण्याची विनंती केली जाते. संबंधित फॉरमॅट्स (फॉर्म ISR-१, ISR-२ इ.) उपलब्ध आहेत आणि ते RTA वेबसाइट https://web.in.mpms.mufg.com/KYC-downloads.html वरून डाउनलोड करता येतात.
(ब) ज्या सदस्यांनी डिमॅट पद्धतीने शेअर्स धारण केले आहेत, ज्यांनी त्यांचा ई-मेल आयडी त्यांच्या डिपॉझिटरी सहभागींकडे नोंदणीकृत/अपडेट केलेला नाही, त्यांना विनंती आहे की त्यांनी ते त्यांच्या डिपॉझिटरी सहभागींकडे नोंदणीकृत/अपडेट करावे, जिथे ते त्यांचे डीमॅट खाते चालवतात.
सेबीने १७ नोव्हेंबर २०२३ च्या परिपत्रकाद्वारे पॅन, केवायसी आणि नामांकन तपशील नसलेल्या फोलिओ गोठवण्याची तरतूद रद्द केली आहे जेणेकरून फोलिओ गोठवण्यामुळे उद्भवणाऱ्या अनपेक्षित आव्हानांना कमी करता येईल.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
ॲस्पिरा पॅथलॅब ॲंड डायग्नोस्टिक्स लिमिटेडसाठी
सही/-
निकुंज व्ही. मांगे
कार्यकारी संचालक
डीआयएनः ०८४८९४४२

ठिकाणः मुंबई
तारीखः ०३ सप्टेंबर २०२५